# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ESBC/२०१५/1068

दिनांक 10 JUL 2015

**प्रति,**

**प्राचार्य,**

सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित

अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र, पदविका/पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था

एम.बी.ए./एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backword Category (ESBC) प्रवर्गातर्गत केलेले प्रवेश तुर्तास अबाधित ठेवण्याबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब दिनांक २१/२/२०१५.

२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१५/६६१ दि. ५/५/२०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भांकित शासन निर्णयामध्ये परिच्छेद क मध्ये नमुद केल्यानुसार दिनांक १४/११/२०१४ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबांधित राहतील असे निर्देश देण्यात आलेले असल्याने तुर्तास या संवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार नाहीत व सदर विद्यार्थी परीक्षेस बसण्यापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी.

मात्र त्याच शासन निर्णयातील परिच्छेद इ मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने त्यांनी त्यानुसार कार्यवाही करुन ती प्रमाणपत्रे त्यांनी प्रवेश घेतलेल्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत विभागीय कार्यालयास / संचालनालयास त्यांच्या प्रवेशाबाबत पुढे निर्णय घेण्यासाठी अतिशीघ्र सादर करणे बंधनकारक आहे याची जाणीव त्यांना करुन द्यावी. त्यांनी उपरोक्त आवश्यक प्रमाणपत्र सादर न केल्यास याबाबत होणा-या परिणामांची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची असेल याची स्पष्ट जाणीव संबंधीत विद्यार्थ्यांना करुन देण्यात यावी.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

S. Plaschand

f प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

**प्रत :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.